बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०३ । अंक – १०७ वा । वार शनिवार दि १७ जानेवारी २०२६ आरएनआय एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 03 Issue - 107 Satuarday 17 January 2026 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

● संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४

गेवराई महावितरणमध्ये कंत्राटदारराज कशाच्या बळावर; आवक-जावक रजिस्टरमध्ये बॅकडेट फेरफार कोणाच्या आशीर्वादाने?; कार्यकारी अभियंता डोंगरे हे महावितरण चालवतायत की कंत्राटदार?

भ्रष्टाचार उघड तरीही कारवाई नाही; कार्यकारी अभियंता डोंगरे यांची जबाबदारी कुठे?

गेवराई महावितरण कार्यालयात सुरू असलेल्या गंभीर गैरप्रकारांबाबत कार्यकारी अभियंता डोंगरे यांची भूमिका संशयास्पद ठरत आहे. कार्यालयात आवक–जावक रजिस्टरमध्ये फेरफार, कंत्राटदारांना बॅकडेट वर्कऑर्डर, ग्राहक तक्रारींकडे दुर्लक्ष असे प्रकार सर्रास सुरू असताना, वरिष्ठ अधिकारी म्हणून डोंगरे यांच्याकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसत नाही.

सर्व बाबींची माहिती असूनही मौन बाळगले जात असल्याने, ते या भ्रष्टाचारापुढे हतबल आहेत की जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत, असा सवाल उपस्थित होत आहे.

सामान्य ग्राहकांसाठी अंधेर; कंत्राटदारांसाठी ग्रीन सिग्नल

गेवराई महावितरण कार्यालयात सामान्य वीजग्राहकांसाठी अक्षरशः अंधेर माजला आहे. वीजपुरवठा खंडित होणे, ट्रान्सफॉर्मर जळणे, अवाजवी वीजबिले, चुकीची मीटर रीडिंग अशा गंभीर तक्रारी घेऊन आलेल्या ग्राहकांना तासन्तास बसवून ठेवले जाते. सर्व्हर डाऊन आहे. लिंक नाही, उद्या या अशी ठरलेली उत्तरे देत त्यांची बोळवण केली जाते. मात्र याच कार्यालयात कंत्राटदारांची फाईल आली, की नियम, वेळ आणि प्रक्रिया बाजूला सारून ती झपाट्याने मंजुरीच्या दिशेने धाव घेत असल्याचे चित्र आहे.

कार्यकारी अभियंता डोंगरे साहेब, गेवराईत हा अंधेर चालू कसा?; आवक-जावक रजिस्टरमधील घाणेरडा खेळ तुम्हाला दिसत नाही का?; की तुम्हीही या व्यवहाराचे भागीदार आहात?

उपअभियंता शाम मोरेंना वरिष्ठांचे आदेश लागू नाहीत का?; ते इतके मुजोर कसे झाले?

नियम पायदळी तुडवण्याचं बळ कुणाकडून मिळतंय, वरचा आशीर्वाद नेमका कुणाचा?

गेवराई । आरंभ वृत्तसेवा

महावितरणच्या गेवराई उपविभागीय कार्यालयातील कारभार दिवसेंदिवस संशयाच्या भोवऱ्यात अडकत चालला असून, या कार्यालयात वीजपुरवठ्याऐवजी भ्रष्टाचाराचाच प्रवाह अधिक वेगाने वाहतो आहे का? असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. नियम, कायदे आणि प्रशासकीय संकेत पायदळी तुडवत येथे कंत्राटदारांना केंद्रस्थानी ठेवून कारभार चालवला जात असल्याचा गंभीर आरोप होत आहे. महावितरणचे ग्राहक देवो भव हे ब्रीदवाक्य गेवराईत केवळ कागदावरच उरले असून, प्रत्यक्ष व्यवहारात मात्र कंत्राटदार देवो भव' हाच अलिखित नियम लागू असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. कोणत्याही शासकीय कार्यालयातील पारदर्शकतेचा कणा मानले जाणारे आवक–जावक रजिस्टर हेच रजिस्टर गेवराई महावितरणमध्ये गैरव्यवहाराचे मुख्य साधन बनल्याचे उघडकीस येत आहे.

विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कंत्राटदारांच्या सोयीसाठी रजिस्टरमध्ये जाणीवपूर्वक रिकाम्या जागा ठेवल्या जातात, जुन्या तारखांमध्ये कामाचे आदेश दाखवण्यासाठी बॅकडेट नोंदी केल्या जातात, पेन्सिलने नोंदी, व्हाईटनरचा वापर व नोंदी खोडून बदलण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत, मुदतवाढ, बिले मंजूर करण्यासाठी कागदपत्रांमध्ये छेडछाड केली जात असल्याचे आरोप आहेत. या सर्व प्रकारांमुळे शासनाचा निधी चुकीच्या मार्गाने वळवला जात असल्याचा संशय अधिक बळावतो आहे. वीजपुरवठा खंडित, जळालेले ट्रान्सफॉर्मर, वाढीव वीजबिल, चुकीची मीटर रीडिंग अशा तक्रारी घेऊन आलेल्या सामान्य ग्राहकांना गेवराई कार्यालयात तासन्तास ताटकळत ठेवले जाते. सर्व्हर डाऊन आहे. लिंक नाही. उद्या या अशी उत्तरे देत ग्राहकांना पिटाळले जाते. मात्र याच कार्यालयात कंत्राटदारांची फाईल आली, की ती क्षणात पुढे सरकते, मंजुरी मिळते आणि नियमांची लवचिकता अचानक वाढतेहा दुजाभाव प्रशासकीय भ्रष्टाचाराचे जिवंत उदाहरण असल्याचे बोलले जात आहे. या संपूर्ण गैरप्रकारांमध्ये गेवराईचे उपअभियंता शाम मोरे यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. नियमांना बगल देत, वरिष्ठांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून कामकाज चालवल्याचे आरोप त्यांच्यावर होत आहेत.

कार्यालयीन कर्मचाऱ्यांमध्येही वरून आशीर्वाद असल्याशिवाय एवढी मुजोरी शक्य नाही. अशी दबक्या आवाजातील चर्चा सुरू आहे. शिवाय या प्रकरणात कार्यकारी अभियंता डोंगरे यांची भूमिका देखील प्रश्नांकित ठरत आहे. कार्यालयात घडणाऱ्या गंभीर गैरप्रकारांची माहिती असूनही ठोस कारवाई होत नसल्याने, ते या भ्रष्टाचारापुढे हतबल आहेत की मौनसंमती देत सहभागी आहेत, असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे.

गेवराई महावितरण सुधारणा करणार की भ्रष्टाचार झाकणार?

सार्वजनिक वीज वितरणासारख्या अत्यावश्यक सेवेत जर असा कारभार चालत असेल, तर तो केवळ प्रशासकीय अपयश नसून सामान्य नागरिकांवरील अन्याय आहे. आता वरिष्ठ पातळीवरून ठोस पावले उचलली जाणार का, की हा प्रकारही नेहमीप्रमाणे फाईलखाली दडपला जाणार, याकडे संपूर्ण गेवराई तालुक्याचे लक्ष लागले आहे.

जीएसटीचे राज्यकर अधिकारी सचिन जाधवर यांचा कारमध्ये मृतदेह आढळला

आत्महत्या की घातपात ? संशयास्पद मृत्यूने बीड हादरले

बीड (आरंभ वृत्तसेवा):– बीड येथील जीएसटी कार्यालयातील राज्य कर अधिकारी सचिन नारायण जाधवर (वय ३५) हे ड्युटीला म्हणून घराबाहेर पडून परत न आल्याने त्यांची बेपत्ता तक्रार नोंदवली गेली होती. मात्र काही तासांतच त्यांचा मृतदेह कपिलधार रोडवरील कमानीजवळ उभ्या असलेल्या त्यांच्या कारमध्ये आढळून आल्याने शहरात खळबळ उडाली आहे. हा मृत्यू संशयास्पद असल्याने पोलिसांनी सखोल तपास सुरू केला असून शवविच्छेदन अहवालानंतरच नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

सचिन जाधवर हे मूळचे चुंब (ता. बार्शी, जि. सोलापूर) येथील असून सध्या बीड शहरातील शिवाजीनगर परिसरात वास्तव्यास

होते. ते बीड जीएसटी कार्यालयात राज्य कर अधिकारी म्हणून कार्यरत होते. काल ड्युटीनंतरही ते घरी न परतल्याने कुटुंबीय चिंतेत होते. रात्रभर संपर्क न झाल्याने आज सकाळी त्यांच्या पत्नीने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात बेपत्ता तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर पोलिसांनी तात्काळ शोधमोहीम हाती घेतली. दरम्यान ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत कपिलधार रोडवरील कमान परिसरात त्यांची कार संशयास्पद स्थितीत उभी असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी गाडी उघडून पाहणी केली असता आतमध्ये सचिन जाधवर यांचा मृतदेह आढळून आला. ही माहिती मिळताच शिवाजीनगर व बीड ग्रामीण पोलीस व वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला असून प्राथमिकदृष्ट्या मृत्यूचे कारण समोर आलेले नाही. घटनेचा पान २ वर...

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांना अंबाजोगाई जिल्हा सत्र न्यायालयाकडून दिलासा

मुंजा गित्ते जमीन खरेदी खटला पुनरुज्जीवित करण्यास स्थगिती

अंबाजोगाई (प्रतिनिधी) – जगमित्र शुगर्स या प्रस्तावित कारखान्यासाठी जमीन खरेदी प्रकरणात माजी मंत्री आ धनंजय मुंडे यांच्या सह तिघांविरुद्ध फसवणूक केल्याच्या खटल्यात अंबाजोगाई न्यायालयाने धनंजय मुंडे व अन्य तिघांना दोषमुक्त केले होते. त्यावर अंबाजोगाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात हा खटला पुन्हा सुरू करण्याचा अर्ज केल्यानंतर न्यायालयाने तो खटला पुनरुज्जीवित करण्याच्या दिलेल्या निर्णयावर धनंजय मुंडे यांनी केलेल्या अर्जावर सुनावणी घेतल्यानंतर स्थगिती दिली आहे.

न्यायालयात धनंजय मुंडे यांच्या वतीने त्यांचे वकील ड. अशोक कवडे यांनी स्थगिती अर्ज दाखल केला होता. धनंजय मुंडे यांच्या वतीने मुंबई उच्च

न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अपील दाखल करे पर्यंत किंवा अपिलाची मुदत पूर्ण होई पर्यंत हा खटला चालविण्यास अंबाजोगाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने ही स्थगिती दिली आहे.

२०११ –१२ साली खरेदी केलेल्या या जमिनीच्या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्या विरोधात बर्दापूर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली, तत्कालीन परिस्थितीत पोलिसांनी तपास करून तक्रारीत तथ्य न आढळल्याने गुन्हा दाखल केला नाही, त्यानंतर उच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल करून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. या खटल्यात दोन्ही पक्षांचे म्हणणे, साक्ष, पुरावे इत्यादी वस्तुस्थिती पाहून अंबाजोगाई न्यायालयाने धनंजय मुंडे व अन्य तिघांना दोषमुक्त केले होते. मात्र त्याविरुद्ध जिल्हा सत्र न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्यावर धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी केलेल्या अर्जावर दोन्ही बाजूंचे म्हणणे न्यायालयाने पान २ वर...

माजलगाव शहरात सासरा जावयामध्ये राडा

माजलगाव प्रतिनिधी,– माजलगाव सामजिक कार्यकर्ते मुस्ताक कुरेशी यांच्या वर तीन वेळ हल्ला ११२ वर सुद्धा मदतीला कोणी पोलिस प्रशासन आले नाही मुस्ताक कुरेशी सामजिक कार्यकर्ते यांनी माजलगाव शहरातील विविध भ्रष्टाचार व अन्य विरुद्ध उपविभागीय अधिकारी कार्यालय समोर आंदोलन पुकारले त्या संदर्भात विद्युत विभाग अंभीयता यांनी त्यांच्या ओफिस मध्ये बैठक घेऊन चर्चा सुरू असताना काही गुडे यांनी आता प्रवेश करुन पहिला हल्ला केला त्यावेळी

मुस्ताक कुरेशी यांनी तात्काळ डाय ११२ वर फोन करून मदतीला पोलिस प्रशासन सांगितले परंतु त्यांना त्याठिकाणी मदतीला कोणी आले नाही नंतर शहर पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली त्याठिकाणी एक अर्ज सुद्धा दिले माझ्या वर हल्ले होणार असून पोलिस संरक्षण देण्यात यावे परंतु त्यांना त्याठिकाणी काहीच मिळाले नाही घराकडे जात असताना त्यांना पोलिसांनी फोन केले कुठे आहे मुस्ताक कुरेशी यांनी रहेमत नगर मध्ये आहे त्यांचा पान २ वर...

महापालिकेत भाजपच 'धुरंधर'

आ. नमिता मुंदडा कडून मुख्यमंत्री व पंकजाताईंचे अभिनंदन.

केज (आरंभ वृत्तसेवा):– महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या अभूतपूर्व आणि ऐतिहासिक यशाबद्दल संपूर्ण राज्यभरातून

जल्लोष साजरा केला जात आहे. या विजयाचे शिल्पकार मानले जाणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चव्हाण आणि

राज्याच्या ग्रामविकास व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. बीड जिल्ह्यातील दिग्गज नेत्यांनी या विजयाचे स्वागत करत नेतृत्वाच्या कौशल्याचे कौतुक केले आहे. मुंदडा परिवाराकडून विजयाचा जल्लोष केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी या विजयाला 'जनतेने विकासावर टाकलेला विश्वास' असल्याचे म्हटले आहे. तसेच अंबाजोगाईचे नगराध्यक्ष नंदकिशोर (काकाजी) मुंदडा आणि युवा नेते अक्षय मुंदडा यांनी मुख्यमंत्री फडणवीस, प्रदेश अध्यक्ष चव्हाण आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या समर्थ नेतृत्वामुळेच हे यश शक्य झाल्याचे सांगत त्यांचे विशेष अभिनंदन केले.

संपादकीय...

'विकसित भारत शिक्षा अधिष्ठान वधेयक'..सुधारणा

विकसित भारत शिक्षा अधिष्ठान विधेयक, २०२५ हा भारताच्या उच्चशिक्षण सुधारणा प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. केंद्र सूचीतील कलम ६६ अंतर्गत असलेल्या घटनात्मक तरतुदींवर आधारित आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या दृष्टिकोनाशी सुसंगत असलेले हे विधेयक म्हणजे उच्चशिक्षणाच्या समन्वित, पारदर्शक आणि जागतिक मानकांनुसार उत्कृष्ट नियमनासाठी एक मजबूत पाऊल आहे. त्यात देशातील उच्चशिक्षण संस्थांमध्ये शैक्षणिक उत्कृष्टता, संस्थात्मक स्वायत्तता आणि राष्ट्रीय क्षमता-निर्मिती लक्षणीयरीत्या मजबूत करण्याची क्षमता आहे.

देशातील उच्चशिक्षणाचे नियमन करणाऱ्या अनेक सर्वोच्च संस्था कार्यरत आहेत: विश्वविद्यालय अनुदान आयोग, नॅशनल कौन्सिल फॉर टीचर्स एज्युकेशन, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय वैद्यकीय परिषद, बार कौन्सिल, फार्मसी कौन्सिल आदी उच्च संस्थांचे एकत्रीकरण व्हावे, असे यात प्रस्तावित आहे.

देशातील उच्चशिक्षण क्षेत्रात सुसूत्रता, लवचीकपणा, क्लिष्टता कमी होणे, उच्चशिक्षण विषयक संस्थांच्या प्रशासनासाठी, नियमनासाठी अधिक सक्षम व सोपी पद्धत अशा शिफारशी करण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरून हे विधेयक करण्यात आले आहे. उच्चशिक्षण संस्थांची अधिस्वीकृती, नियमन, मानके निर्माण करणे व मान्यता देणे यासाठी शिखरसंस्था स्थापन केली जाईल. या एकत्रीकरणामुळे उच्चशिक्षण क्षेत्रात हुकूमशाही निर्माण होईल, असे अनेकांचे म्हणणे आहे. गेल्या काही दशकांत भारताच्या उच्चशिक्षण क्षेत्राने अभूतपूर्व वाढ अनुभवली. सध्या देशात बाराशेहून अधिक विद्यापीठे आणि हजारो उच्चशिक्षण संस्था, चार कोटींहून अधिक विद्यार्थ्यांना सेवा देत आहेत. या विस्तारामुळे विद्यार्थ्यांचा प्रवेश सुलभ झाला असला तरी, अनेक वैधानिक संस्थांच्या अस्तित्वामुळे गोंधळ, भोंगळपणा आणि नियमांच्या पूर्ततेमध्ये दुहेरीपणा निर्माण झाला आहे.

प्रस्तावित विकसित भारत शिक्षा अधिष्ठान (तइड-), एक सर्वोच्च संस्था म्हणून उच्चशिक्षण क्षेत्राला सुव्यवस्थित करण्याचा प्रयत्न करणार आहे. हे विधेयक उच्चशिक्षण क्षेत्राचे उत्तरदायित्व सुनिश्चित करताना विश्वासावर आधारित प्रशासनाला प्रोत्साहन देते. मानवी हस्तक्षेप कमी करण्याचा, तंत्रज्ञान-सक्षम एक-खिडकी प्रणालीकडे जाण्याचा निर्णय महत्त्वपूर्ण आहे. कारण त्यामुळे चांगली कामगिरी करणाऱ्या संस्थांची कार्यक्षमता, वस्तुनिष्ठता वाढणार आहे आणि त्यांचा प्रशासकीय भार कमी होणार आहे.

हे विधेयक राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थांची सध्याची स्वायत्तता स्पष्टपणे सुरक्षित करते. त्याच वेळी विद्यापीठे आणि इतर उच्चशिक्षण संस्थांसाठी एकूण नियामक धोरण मजबूत करते. प्रस्तावित मानक परिषद, नियामक परिषद आणि मान्यता परिषद - आपापल्या कार्यक्षेत्रात स्वतंत्रपणे कार्यरत राहून एक मजबूत नियंत्रण आणि संतुलन यंत्रणा तयार करतील. ही प्रस्तावित रचना आंतरविद्याशाखीय शिक्षण, संशोधन-आधारित अध्यापन आणि उद्योगांशी संबंधित कौशल्य विकासाला चालना देण्याच्या उच्चशिक्षण संस्थांच्या दृष्टिकोनाला पूरक आहे. पारदर्शकता, विद्यार्थ्यांच्या अभिप्रायांवर आधारित मूल्यांकन आणि एक मजबूत तक्रार निवारण यंत्रणा, विद्यार्थी-केंद्रित धोरण निर्माण करण्यास या रचनेची मदतच होईल.

आत्मनिर्भरतेवर विधेयकाने दिलेला भर अतिशय महत्त्वाचा आहे. संस्थांमध्ये नावीन्य आणण्यास आणि शैक्षणिक अभ्यासक्रमांना राष्ट्रीय विकासाच्या प्राधान्यांशी जोडण्यासाठी सक्षम करून, प्रस्तावित रचना भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक असलेल्या प्रतिभावंतांच्या प्रयत्नांना बळकटी देते.

विकसित भारत शिक्षण अधिष्ठान विधेयक, २०२५ या विधेयकाकडे उच्चशिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ एक सुसंगत, जागतिक स्तरावर स्पर्धात्मक आणि भविष्यासाठी सज्ज उच्चशिक्षण प्रणाली तयार करण्याच्या दिशेने टाकलेले एक उत्कृष्ट पाऊल म्हणून पाहतात. देशातील उच्चशिक्षण संस्था उत्कृष्टतेचे प्रदर्शन करण्यासाठी, प्रतिभेचे संगोपन करण्यासाठी आणि विकसित व आत्मनिर्भर राष्ट्राच्या दिशेने भारताच्या प्रवासात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी नवीन धोरणाप्रमाणे काम करण्यास कटिबद्ध होत आहेत. या प्रस्तावित शिखर संस्थेची नियमावली अजून प्रसिद्ध झालेली नाही. ही नियमावली लवचीक, विधेयकातील तरतुदींशी सुसंगत असेल तरच या विधेयकाचा कायद्यात रूपांतर झाल्यावर देशास फायदा होऊ शकेल. हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या 'संयुक्त चिकित्सा समिती'कडे पाठविले आहे. त्यामध्ये या विधेयकावर सविस्तर चर्चा होईल. उच्चशिक्षण क्षेत्रातील कार्यरत तज्ज्ञांनी या समितीकडे आपल्या सूचना जरूर पाठवल्या पाहिजेत.विकसित भारत शिक्षा अधिष्ठान विधेयक, २०२५ हा भारताच्या उच्चशिक्षण सुधारणा प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. केंद्र सूचीतील कलम ६६ अंतर्गत असलेल्या घटनात्मक तरतुदींवर आधारित आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या दृष्टिकोनाशी सुसंगत असलेले हे विधेयक म्हणजे उच्चशिक्षणाच्या समन्वित, पारदर्शक आणि जागतिक मानकांनुसार उत्कृष्ट नियमनासाठी एक मजबूत पाऊल आहे. त्यात देशातील उच्चशिक्षण संस्थांमध्ये शैक्षणिक उत्कृष्टता, संस्थात्मक स्वायत्तता आणि राष्ट्रीय क्षमता-निर्मिती लक्षणीयरीत्या मजबूत करण्याची क्षमता आहे.

उमापूरात महाराष्ट्र चायनीज सेंटर'चे दिमाखदार उद्घाटन

गेवराई, (प्रतिनिधी):- उमापूर बस स्टॉप येथे नव्याने सुरू झालेल्या महाराष्ट्र चायनीज सेंटरचे उद्घाटन मोठ्या उत्साहात व थाटात पार पडले. स्वादिष्ट, स्वच्छ आणि दर्जेदार पदार्थांसोबतच भरपूर क्वांटिटी देण्याचा निर्धार या सेंटरच्या माध्यमातून करण्यात आला असून, उमापूरकरांच्या खाद्यप्रेमींना आता नवी चव अनुभवायला मिळणार आहे.

या सेंटरचे मालक शेख बालम भाई यांनी उद्घाटनप्रसंगी बोलताना सांगितले की, ग्राहकांचा विश्वास जपणे, उत्तम दर्जाची सेवा देणे आणि परवडणाऱ्या दरात उत्कृष्ट चव देणे हेच महाराष्ट्र चायनीज सेंटरचे ध्येय राहील.

उद्घाटन समारंभास माजी जिल्हा परिषद सदस्य संग्राम नाना आहेर, माजी उपसरपंच जयदीप बापू औटी, माजी पंचायत समिती सदस्य महादेव काका औटी, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ पोकळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यावेळी अजय पापा औटी, हार्डवेअर व्यावसायिक शब्बीर शेख, शोएब कुरेशी, सत्तार शेख, गफार कुरेशी, अशोक बडे, सलाम शेख, मिया शेख, उस्मान शेख, संदीप कापसे, इमरान शेख, कैलास कापसे, रमेश कापसे, नेहाल शेख आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उमापूर परिसरात दर्जेदार चायनीज खाद्यपदार्थांची उणीव भरून काढणारे हे सेंटर लवकरच तरुणाईसह सर्वच वयोगटातील ग्राहकांचे आकर्षण ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. उद्घाटनानिमित्त परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

मनरेगा २००५ हा कायदा रेशन व्यवस्था व्यवस्थित करावी या मागण्याना घेऊन महाराष्ट्र शेतमजूर व इतर ग्रामीण मजूर युनियन निर्देशने करणार

सिरसाळा (प्रतिनिधी):- आज दि.१६/०१/२०२५ रोजी मनरेगा कायद्यात केलेल्या बदलाच्या व भूमिहनांना रेरान व इतर मागण्याना घेऊन दि.१९/१/२०२६ सोमवार रोजी सकाळी ११:००वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक सिरसाळा या ठिकाणी महाराष्ट्र शेतमजूर व इतर ग्रामीण मजूर युनियन च्या वतीने निदर्शने करण्यात येणार आहेत.

या आंदोलनाच्या प्रमुख मागण्या १)मनरेगा २००५ हा कायदा कायम ठेवावा. २)भूमिहिनांना रेशन द्या व कुटुंबातील इतर सदस्यांचा रेशन मध्ये समावेश करूण त्यांच्या नावाचे धान्य वाटप करा ३)सन २०२३ मधील सिरसाळा येथील पं.दिनदयाळ घरकूल जागा खरेदी अर्थ साहय्य योजने अंतर्गतचा हप्ता तात्काळ वाटप करा. ४)वृद्ध निराधार पेंशन मधील वंचीत निराधारांचा समावेश करून त्यांचा पगार दर महिन्याला वाटप करा

५)घरकूल धारकांना केरळ च्या धर्तीवर १० लाख रु. वाढीव निधीची तरतूद करा. ६) निवासी गायराणधारकांना मालकी हक्काचा पी.टी.आर घ्या ७)बेघरांना राहण्यासाठी पं. दिन दयाळ योजनेतून प्लाट खरेदी करुण घरकूल द्या, आशा आंदोलनात असलेल्या मागण्याचे गटविकास अधिकारी व तहसीलदार परळी यांना निवेदन वेताना कॉ.प्रकाश उजगरे, कॉ. पंडीत शिंदे, कॉ. भगवानराव बडे, माणिक तात्या किरवले, महादेव आप्पा तरकसे,निवृत्ती बोडके,कॉ.अशोक जाधव व इतर कार्यकर्ते हजर होते.

कापूस आयात शुल्कात सूट दिल्यास शेतकरी हक्क मोर्चा रस्त्यावर उतरेल : राजेंद्र आमटे

बीड (प्रतिनिधी):- कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन टेक्स्टाईल इंडस्ट्री (उखढख) च्या मागणीनुसार केंद्र सरकारने यापूर्वी कापूस आयातीवरील ११ टक्के आयात शुल्क माफ केले होते. या निर्णयामुळे राज्यासह देशातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचा आरोप शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आला आहे.

सरकारने व्यापारीधोरण अवलंबून मोजक्या टेक्स्टाईल उद्योगपतींच्या फायद्यासाठी कापूस आयात शुल्क माफ करून देशातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम केले, असा घणाघाती आरोप शेतकरी हक्क मोर्चाने केला आहे. ३१ डिसेंबरनंतर पुन्हा कापूस आयातीवर शुल्क लागू झाले असताना, आता पुन्हा सीआयटीआयने सरकारकडे आयात शुल्कात सवलत देण्याची मागणी केली आहे.

सरकारने पुन्हा एकदा कापूस आयात शुल्कात सवलत दिल्यास शेतकरी हक्क मोर्चा तीव्र आंदोलन छेडेल व शेतकरी रस्त्यावर उतरण्यास भाग पाडले जातील, असा इशारा मोर्चाच्या वतीने देण्यात आला आहे. भारत हा कृषीप्रधान देश असून, शेतीवर आधारित अर्थव्यवस्थेचा कणा शेतकरी आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांचे हित न पाहता शेतकऱ्यांचे हित जपण्याची जबाबदारी सरकारची आहे. कापसावरील सध्याचे ११ टक्के आयात शुल्क माफ न करता ते वाढवून किमान २२ टक्के करण्यात यावे, अशी ठाम मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली आहे. जर सरकारने पुन्हा कापूस आयात शुल्कात सूट लागू केली, तर शेतकरी रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय राहणार नाही, याची गंभीर दखल सरकारने घ्यावी, असा इशारा शेतकरी हक्क मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांनी दिला आहे.

सिरसाळा : अनंत श्री विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने दिनांक. १७ जानेवारी रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र सिरसाळा येथे रक्तदान शिबिराचा कार्यक्रम ठेवलेला आहे आपली उपस्थिती प्रार्थनीय आहेनंत श्री विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने दिनांक. १७ जानेवारी रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र सिरसाळा येथे रक्तदान शिबिराचा कार्यक्रम ठेवलेला आहे आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे यावेळी उपस्थित अशोक बनसी जाधव. सिरसाळा स. नयुम भाई.रामराम ज्ञानोबा फड. सतीश राऊत.अमर राउत.महादेव बडू राउत. रोहित जाधव. अमोल मिरगे.व दैनिक आरभ चे परळी तालुका प्रतिनिधी बापु किरवले हे उपस्थित होते.

पान १ वरून..

जीएसटीचे राज्यकर अधिकारी सचिन जाधवर यांचा कारमध्ये मृतदेह आढळला

सर्व बाजूंनी तपास सुरू असून मोबाईल कॉल डिटेल्स, सीसीटीव्ही फुटेज व इतर पुराव्यांच्या आधारे पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले. परंतु अधिकाऱ्याचा मृतदेह असा कार मध्ये आढळल्याने आत्महत्या की घातपात? याची चर्चा शहरभर पसरली.

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांना अंबाजोगाई जिल्हा सत्र न्यायालयाकडून दिलासा

ऐकल्यानंतर स्थगिती देण्यात आली असून, श्री मुंडे यांना अपील करण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आला आहे. न्यायालयाचा स्थगिती निकाल स्वयंस्पष्ट असून तो न्यायालयाच्या पोर्टलवर देखील उपलब्ध आहे. मात्र याबाबत अर्धवट माहितीच्या आधारे कुणीतरी खोडसाळपणाने चुकीचे वृत्त प्रसिद्ध केले असून, संबंधितास कायदेशीर नोटीस पाठवणार असल्याचे मुंडे यांचे वकील ड. अशोक कवडे यांनी सांगितले आहे.

माजलगाव शहरात सासरा जावयामध्ये राडा

वेळीस व्हाट्सअप वरती मोबाईल लोकेशन टकले त्यांचा वेळीस परत वीस पंचवीस हल्लेखोरांनी हल्ला केला त्यांच्या तावडीतून लोकांनी सोडविले आणि माजलगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले त्यांची प्रकृती खालावली प्रथमोपचार करण्यासाठी बीड जिल्हा शल्यचिकित्सक येथे उपचारासाठी पाठविण्यात आले आहे अशी घटना घडली तरी पोलिस प्रशासनाने सामाजिक कार्यकर्ते वर संरक्षण किंवा मदतीला सुद्धा गेले नाही त्यांचा बळी घेतले वर यह पोलिस प्रशासनास जाग येईल का असा प्रश्न निर्माण होत आहे जिल्हाधिकारी यांना दि.३०/१२/२०२५ ईमेल व्दोर पोलिस संरक्षण देण्याची मागणी केली परंतु त्याला काहीच मिळाले नाही तर सर्व सामान्य माणसाला न्याय काय मिळणार

पान ४ वरून..

गरिबांचे अतिक्रमण असते तर लगेचच जेसीबी ने काढले असते पाकिटात कायदा गुंडाळला का?

करण्यात आली व आमचे १५ ऑगस्ट आणि १७ सप्टेंबर रोजीचे जलसमाधी आंदोलन अतिक्रमण काढू म्हणून स्थगित करण्यात आले होते. आतिक्रमण धारकांना दिलेल्या नोटीसांच्या आणुषंगाने अतिक्रमण काढणे बंधनकारक असताना देखील टाळाटाळ करण्यात आल्यामुळे मी शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगने आम्ही दोघांनी मिळून असा नाईलाजाने निर्णय घेतला आहे की आम्ही दिनांक २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनी पुन्हा तलवाडा येथील सरकारी गायरान जमिनीमध्ये असलेल्या पाझर तलावात स्थानिय प्रशासकीय अधिकाऱ्याच्या वेळकाढूपणामुळे जलसमाधी आदोलन करणार आहोत. आमच्या जीवितास कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची राहील त्यातल्या त्यात तलवाडा ग्रामपंचायतचे प्रशासक चोपडे साहेब व ग्रामसेवक मुसळे साहेब आणि गटविकास अधिकारी सानप साहेब यांची राहील, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी प्रशासनास निवेदन देऊन दिला आहे.

तलवाडा गाव तलाव लगटच्या आतिक्रमण संदर्भात जिल्हाधिकारी, बीडीओ, ग्रामसेवक व प्रशासकाची भुमीका संशयास्पद! गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव संरक्षण भीती लगटच्या आतिक्रमण ऊठवण्या संदर्भात जिल्हाधिकारी बीड, बीडीओ गेवराई, ग्रामसेवक व प्रशासक तलवाडा यांना वेळोवेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी निवेदन देऊन हे आतिक्रमण ऊठवण्याची मागणी केली होती. त्या आणुषंगाने संबंधित प्रशासनाने आतिक्रमण धारकांना स्वताहून आतिक्रमण काढुन घेण्या संदर्भात दोन दोन नोटीस देऊन अर्थिक तडजोडीतुन हे प्रकरण पेंडिंग ठेवल्याची चर्चा होत आसल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी या बाबत संबधित प्रशासनास परत स्मरण पत्र व निवेदन देऊन हे आतिक्रमण ऊठवण्या संदर्भात मागणी करत २६/१/२०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी तलवाडा गाव तलावात जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला आहे.

ग्रामपंचायत चा कारभार गरिबाला लता, श्रीमंताला माथा

बेकायदेशीर पैसेवाले अतिक्रमण वाले हे बाजार रोड या ठिकाणी बे सुमार अतिक्रमण केले असुन गावातलवास मोठ्या प्रमाणावर धोखा निर्माण झाला असुन काही वेळेस पावसाळ्यात हेच अतिक्रमण वाले दुकानात पाणी पाझर निर्माण झाल्यास मोटारीने पाणी उपसा करतात हेच मोटारीचे पाणी रस्त्यावर सोडुन देतात त्या मुळे चालता सुद्धा येत नाही त्यात शाळेतील विद्यार्थी बस गाड्या अशा अनेक वाहने मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण केली असुन एका हार्डवेअर दुकान वाल्यांनी चक्क पाईप रस्त्यावर ठेवले असुन काहींनी तर चक्क गाव तलावाची मातीच्या भिती कोरून तलावास धोखा निर्माण करत बांधकाम केले असुन ग्राम पंचायत प्रशासकाची हाताची घडी तोंडावर बोट की मलिदा पायी कारवाई होत नसल्याचे चर्चा पाहावयास मिळत असुन एकाने तर नोटीस बजावली असताना रात्री तून पत्र्याचे शेड उभा केले असुन कायदा फक्त गरीबाला पैसे वाल्यांना माथा २६ जानेवारी पर्यंत बेकायदेशीर अतिक्रमण वाल्या वर कशाप्रकारे कारवाई करण्यात येते तालुक्याचे लक्ष लागले आहे

अंबाजोगाई पाणीपुरवठा नवीन पाइपलाइनच्या ७ किमी ची चाचणी यशस्वी-नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा

नगराध्यक्षपदाचा पदभार घेताच शहाराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याला प्राधान्य असेल असे सांगितले होते. त्या दिशेने त्यांनी कामाला सुरुवात केली असल्याचे दिसत असून, धनेगाव ते अंबाजोगाई या नवीन पाइपलाइनच्या ७ किमी ची आज शनिवारी (दि.१७) नगरपालिका पाणीपुरवठा अभियंता, कर्मचारी यांच्यास चाचणी घेतली आहे. ७ किमी पर्यंत आवश्यक दाबात पाणी पोहोचले असून ही चाचणी यशस्वी झाली. यामुळे आता पुढील चाचणी होऊन लवकरच अंबाजोगाईकरांची पाणी टंचाईतून सुटका होऊन दिलासा मिळणार अशी आशा व्यक्त केली जात आहे.

पिठासीन अधिकारी म्हणून पहिलीच सर्वसाधारण सभा: नगराध्यक्षांच्या प्रशासकीय कामकाजाची दिसली प्रभावी चुणूक !

पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी केली. निवड प्रक्रियेदरम्यान सर्व कायदेशीर तरतुदी, नियम व अधिनियमांचे पालन करत ही प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यात आली. नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी पीठासीन अधिकारी म्हणून सभेचे कामकाज प्रभावीपणे व शिस्तबद्ध पद्धतीने हाताळले.नवीन उपाध्यक्ष व नामनिर्देशित सदस्यांचे सभागृहात अभिनंदन करण्यात आले. उपस्थित सर्व नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानून नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सभा संपन्न झाल्याचे जाहीर केले. प्राधिकृत अधिकारी म्हणून गेवराई नगरपरिषद मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, परळी न.प.चे उपमुख्यअधिकारी संतोष रोडे आदींनी प्रशासकीय कामकाज करून ही सर्वसाधारण सभा यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

मराठवाडा जनता विकास परिषद,परळी यांची सिनीअर डीसीएम यांच्याकडे मागणी

रेल्वे स्थानकातील आरक्षण कार्यालयाची कामाची वेळ वाढवावी. रेल्वे स्टेशन व परीसरातील सीसीटीव्ही कॅमेरा व रेल्वे डब्ब्यांचे डिस्पले चालू ठेवणे

यासह ईतर मागण्या करण्यात आल्या यावेळी डीसीम शिफाली कुमार यांनी परळी रेल्वे स्थानकातील अद्यावत सुविधा व प्रवाशांच्या सोयींकरिता करण्यात येत असलेल्या कामकाजाविषयी संवाद साधून अडचणी जाणून घेतल्या यावेळी मराठवाडा जनता विकास परीषद,परळी अध्यक्ष तथा माजी नगरसेवक चेतन सौंदळे,पदाधिकारी श्रीकांत पाथरकर,ऋषीकेश बारगजे,गजानन हालगे,निरंजन गौरशेट्टे,दीपक कुरील आदिंची उपस्थिती होती. परळी मार्गे विविध ठिकाणी रेल्वे सुरू करणे तसेच पिट लाईन यंत्रणा व रेल्वे स्थानकात अद्यावत सुविधा निर्माण करण्याचे काम रेल्वे विभागामार्फत जलद गतीने करण्याकरिताची शिफारस रेल्वे मंत्रालय व रेल्वे बोर्डाकडे पाठविण्याचे आश्वासन शिफाली कुमार यांनी शिष्टमंडळास दिला आहे

लिंबागणेश पंचक्रोशीतील धनगर बांधव मुंबईकडे रवाना होणार-डॉ.ढवळे

काढण्यात येणाऱ्या धनगर समाजाच्या आरक्षणासाठीच्या न्याय मागणीला मराठा समाजासह अठरापगड जातीतील समाजबांधवांचा जाहीर पाठिंबा असून, सर्व समाजबांधवांनी या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे यांनी केले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड तसेच नेकिनूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन पाठविण्यात आले आहे.

यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी, रविंद्र निर्मळ, सुरेश निर्मळ, बाळासाहेब मुळे, बाळासाहेब मोरे पाटील, अनंतकाका मुळे, हरिओम क्षीरसागर, संदीप मुळे, शहादेव धलपे, गणपत तागड, रामदास मुळे, रामचंद्र मुळे,महावीर मुळे, संतोष वाणी, विनायक वाणी, संजय सुकाळे, प्रविण मुळे, जीवन मुळे, रोहन तागड, रामराजे मुळे, नवनाथ मुळे, केशव गिरे, कल्याण कोकाटे, दत्ता मुळे, आप्पा मुळे अमोल पितळे, बंडू ढगारे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी आ.भीमराव धोंडे यांनी रामकथेचे केले श्रवण; कथा निरूपणकार ह.भ.प.मंदार महाराजांच्या कौशल्याचे कौतुक!

अशा धार्मिक उपक्रमात सहभागी झाले पाहिजे अशी भावना त्यांनी व्यक्त केली.या संगीत राम कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मानवी जीवनामध्ये सत्य,संयम,कष्ट, परिश्रम माणुसकी, मानवता, एकोपा, ऐक्य आणि सर्वधर्मसमभाव ही मूल्य मौल्यवान असतात.या मूल्याला अधोरेखित करण्याचे काम अर्थातच धर्म करीत असतो. त्या अनुषंगाने मानवता वादाचा सर्वांनी पुरस्कार करून अशा कथा निरूपणाला आवर्जून उपस्थित राहण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. यावेळी सौ प्राजक्ताताई धस, शैलजा थोरवे, सुखलाल मुथा, दिनकरराव तांदळे,अशोकदेवा जोशी, माजी सरपंच नामदेव राऊत, डॉ. मधुकर हंबर्डे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, प्रफुल्ल सहस्रबुद्धे,उत्तम बोडखे,प्रवीण पोकळे,सचिन रानडे,शरद रेडेकर,हौसराव आजबे,सतीशशेठ धस आदि सामाजिक, राजकीय, धार्मिक, क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कथाकार ह.भ.प.मंदार महाराजांच्या पवित्रवाणीचा सुगंध दरवळला!

आपल्या पवित्रवाणीतून आणि केलेल्या अभ्यासातून रामायणातील अनेक प्रसंग साक्षात जिवंत करण्याचे हातोटी आणि कौशल्य ह.भ.प. मंदार महाराज रामदासी यांना लाभलेले आहे. त्यांच्या वाणीतून अनेक भाविक भक्तांमध्ये अध्यात्म समर्पणाचा भाव निर्माण होण्याची प्रेरणा निर्माण होईल असा विश्वास व्यक्त करत ह.भ.प.मंदार महाराज यांच्या कथा निरूपण कौशल्याचे मनापासून माजी आ.भीमराव धोंडे यांनी कौतुक केले आणि आयोजकांनाही धन्यवाद दिले.

बीड ते नाळवंडी रस्त्याच्या निकृष्ट कामावरून भाजप

सरपंच रवी गंगावणे, संजय बापू काळे, आत्माराम सोनवणे, अशोक सोनवणे, नामदेव म्हेत्रे, रोहित राऊत, राघोजी राऊत, राजू पटेल, बाळू आमटे, घोडके, अभिमान गुंदेकर, विकास यादव, प्रशांत जाधव, मधुकर राऊत, दत्तप्रसाद सानप, बाबासाहेब काळे, युनूस शेख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी पुढील टप्प्यात हा रस्ता सिमेंट काँक्रीटीकरणाचा करून द्यावा, तसेच या कामासाठी पाठपुरावा करावा, अशीही मागणी केली.

श्रीराम कथा सोहळ्यात मुस्लिम युवकाकडून अनोखा सन्मान

धर्म-सौहार्दाचा सुंदर संदेश देणारा प्रेरणादायी प्रसंग

आष्टी (प्रतिनिधी):- धर्मांविषयी जगभरात चर्चा होत असताना, आष्टीत मात्र एक साधा पण थेट मनाला हात घालणारा प्रसंग घडला. श्रीराम कथा भव्य दिव्य ज्ञानयज्ञ सोहळ्यात हा क्षण उलगडला, जिथे धर्मापलीकडची माणुसकी अग्रक्रमाने झळकली.

प्रसिद्ध रामकथाकार मंदार महाराज रामदासी यांच्या अमृतमय वाणीने मंत्रमुग्ध झालेल्या श्रोत्यांमध्ये, त्या दिवशी एक वेगळाच भाव भरला एकता, सलोखा आणि भारतीयत्वाचा. आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील शिवरायांचा मुस्लिम मावळा म्हणून ओळखले जाणारे समीर बादशहा शेख मंचासमोर पुढे गेले, आणि त्यांनी प्रभू श्रीरामचंद्रांची प्रतिमा व गमचा अर्पण करून महंतांचा सन्मान केला. त्या क्षणी संपूर्ण मंडपात शांतता पसरली आणि मग टाळ्यांचा एकच गडगडाट उसळला.

धर्मभेदाच्या चर्चा करणाऱ्यांनी हा प्रसंग पाहिला असता तर कदाचित त्यांचीही मते क्षणभर थबकली असती. कारण इथे धर्म बोलत नव्हता, तर हृदयातून निघालेला एक संस्कारबद्ध भाव बोलत होता तू कोणत्याही देवाचा भक्त असलास, तरी मी तुझा आदर करतो.समारंभाला उपस्थित असलेल्या सौ. प्राजक्ताताई धस, प्रियंका ताई खेडकर, सायली हंबर्डे, विजय महाराज राजपुरे, युवा उद्योजक महेश हंबर्डे, पत्रकार संतोष नागरगोजे, राजू रणशिंग यांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. त्यांच्या चेहऱ्यावरील स्मितहास्यही त्या प्रसंगाच्या सौंदर्यात भर घालत होते. आजच्या धावपळीच्या आणि मतभेदांनी भरलेल्या वातावरणात, अशा छोट्या पण प्रभावी कृती दुर्लक्षित करता येत नाहीत. कारण त्या समाजाला हे आठवण करून देतात की धर्म जन्माने मिळतो, पण मानवता हा आपण निवडलेला मार्ग असतो समीर शेख यांचा हा उपक्रम हेच सांगून जातो की, छत्रपतींच्या परंपरेतील मावळे आजही मनाने विशाल आहेत आणि श्रीरामांच्या आदर्शांचे महत्त्व आजही सर्व धर्मांच्या लोकांना सारखेच भासते.हा प्रसंग आष्टीच्या सामाजिक इतिहासात नोंद राहील, कारण तो केवळ एक सन्मान नसून, समाजाला दिशा देणारा एकतेचा संदेश होता.

श्री वैकुंठवासी हरिभक्त परायण ज्योतिष्य विशारद बन्सी महाराज दायमा यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात कुक्कडगाव येथे साजरी

बीड (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील सर्वात अग्रेसर असलेले कुकडगाव या ठिकाणी हरिभक्त परायण ज्योतिष्य विशारद श्री बन्सी महाराज दयमा यांची २४ वी पुण्यतिथी मोठ्या उत्साहामध्ये आज संपन्न झाली त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री दत्त मंदिर संस्थान या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन श्री हरिभक्त परायण गोवर्धन महाराज पवार यांच्या वतीने करण्यात आले होते यामध्ये श्री हरी किर्तन सकाळी अकरा ते एक या दरम्यान हरिभक्त परायण श्री पुरुषोत्तम महाराज मस्के यांचे सुश्राव्य असे वेदांत व्याकरणावर कीर्तन संपन्न झाले त्यांनी अनेक भाविक भक्तांचे या ठिकाणी उपस्थित असलेल्या मन जिंकले व सर्वांना मंत्रमुग्ध केले अतिशय उत्कृष्ट आणि अप्रतिम वेदांताचा अभ्यास असणारे महाराज या कीर्तनाला लाभल्यामुळे सर्व भाविक भक्तांमधून या ठिकाणी समाधान भाविक भक्तांच्या चेहऱ्यावर दिसून आले हरी कीर्तना नंतर हरिभक्त परायण गोवर्धन महाराज दत्त संस्थान कुक्कडगाव यांच्या वतीने पंचक्रोशीतील व कुकडगाव ग्रामस्थांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते आणि सायंकाळी संगीत भजनानी या पुण्यतिथीची सांगता झाली यावेळी शेकडो भाविक भक्त कीर्तनासाठी व महाप्रसादासाठी व संगीत भजनासाठी कुकडगाव श्री दत्त मंदिर संस्थान या ठिकाणी उपस्थित होते हरिभक्त परायण गोवर्धन महाराज पवार यांनी मंदिराच्या वतीने केली हरिभक्त परायण श्री ज्योतिष विशारद बन्सी महाराज दयमा यांनी सर्व भाविक भक्तांसाठी या ठिकाणी श्री दत्त मंदिर स्थापन करून ठेवल्यामुळे देखील सर्व भाविक भक्तांमध्ये एक भक्तिमय वातावरण दिसून आले बन्सी महाराज असताना त्यांनी अनेक लोकांना चांगल्या प्रकारे धार्मिक उपदेश करून अनेक भाविक भक्तांना त्यांनी चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले भगवंताचे नामस्मरण केल्याने उद्धार होतो असा संदेश देखील महाराज असताना सर्व भाविक भक्तांना दिल्यामुळे प्रतिदिवशी तसेच दत्त जयंती दिवशी देखील भाविक भक्त मंदिरामध्ये आवर्जून श्री गुरुदत्तात्रेय यांचे दर्शन घेण्यासाठी येत असतात म्हणून महाराजांच्या या उत्कृष्ट त्यांनी केलेल्या धार्मिक उपक्रमाचे देखील सर्व भाविक भक्त यांच्यामधून एक आनंदमय व भक्तिमय समाधान व्यक्त होत आहे हरी कीर्तनाला उपस्थित असलेल्या सर्व टाळकऱ्यांना ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी या महान ग्रंथाचे श्री हरिभक्त परायण पुरुषोत्तम महाराज यांच्या हस्ते श्री संस्थान दत्त मंदिर यांच्या वतीने महान ग्रंथाचे ज्ञानेश्वरीचे वाटप करण्यात आले म्हणून येथे उपस्थित असलेल्या सर्व भाविक भक्तांमध्ये टाळकऱ्यांमध्ये एक आनंदाचे व विभक्तीमय आनंदमय ज्ञानमय असे वातावरण वातावरण दिसून आले

ह.भ.प.लोखंडे महाराज यांना गंगाई बाबाजी समाजभूषण पुरस्कार

पाटोदा (प्रतिनिधी) दि.२ जानेवारी समाजातील अध्यात्मिक,धार्मिक व तर्कशास्त्रीय क्षेत्रात आगळेवेगळे व समाजोपयोगी कार्य करणारे ह.भ.प.राजू महाराज लोखंडे यांची गंगाई-बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे. गंगाई-बाबाजी पुरस्कार संयोजन समितीच्या वतीने हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून त्यांच्या कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात जन्मलेले राजू महाराज लोखंडे यांचे प्राथमिक शिक्षण दिघोळ ता.जामखेड येथील जिल्हा परिषद शाळेत झाले.शालेय जीवनापासूनच अध्यात्माची ओढ असलेल्या महाराजांनी पुढे एम.ए.पर्यंत शिक्षण पूर्ण केले.पाटोदा येथे स्थायिक झाल्यानंतर त्यांनी खेमानंद महाराजांचे शिष्यत्व स्वीकारले.काही काळ वैराग्यमूर्ती ह.भ.प.रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत सेवा केल्यानंतर अध्यात्मिक साधनेला पूर्णतः वाहून घेतले.

ब्रह्मचारी वृत्तीने जीवन जगत असताना त्यांनी तारखेच्या तर्कशास्त्रावर आधारित विलक्षण ज्ञान आत्मसात केले.कोणताही ज्योतिषशास्त्राचा औपचारिक अभ्यास न करता केवळ तर्कशक्तीच्या आधारे व्यक्तीची जन्मतारीख, वार तसेच जीवनातील संभाव्य घटना अचूकपणे सांगण्याची अद्भुत क्षमता त्यांनी प्राप्त केली आहे.त्यांच्या अनेक भाकितांचा अनुभव आजवर खरा ठरलेला असून राज्य व जिल्हा पातळीवरील अनेक राजकीय व सामाजिक अंदाज चर्चेचा विषय ठरले आहेत.विशेष म्हणजे नैराश्यात सापडलेल्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्यातील येणाऱ्या सकारात्मक क्षणांची जाणीव करून देत आत्महत्येसारख्या टोकाच्या विचारांपासून परावृत्त करण्याचे समाजकार्य महाराज सातत्याने करत आहेत. तसेच सामाजिक, अध्यात्मिक व पर्यावरण विषयक जनजागृतीचे कार्य अहोरात्र सुरू आहे.

यापूर्वी त्यांना समाजरत्न पुरस्कार १४ नोव्हेंबर २०२५ प्रदान करण्यात आला असून आता गंगाई-बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५ जाहीर झाल्याने त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव झाला आहे.पुरस्कार मिळाल्याबद्दल हभप राजू महाराज लोखंडे यांचे आ.सुरेश धस,उद्योजक परमेश्वर शेठ येवले इंदौर,शिवसेना उपजिल्हाप्रमुख व चराठा पंचायत समिती इच्छुक उमेदवार गणेश उगले,राजुरी जिल्हा परिषद गटाचे शिवसेना महायुती इच्छुक उमेदवार सतीश शेळके,लिंबागणेश जिल्हा परिषद गटाचे एनसीपी इच्छुक उमेदवार संजय पवार,यांच्यासह या पुरस्कार निवडीबद्दल सर्व स्तरातून हभप राजू महाराज यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

विशेष शिबिराच्या उपक्रमांमधून युवकांनी प्रेरणा घेतली पाहिजे-एपीआय वर्षा व्हगाडे

वडवणी (आरंभ वृत्तसेवा):- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या कालावधीत स्वतःच्या प्रगतीसाठी आपण वेळ दिला पाहिजे. कारण महाविद्यालयीन युवकांचे जीवन हे या काळामध्येच योग्य दिशेने जाणे आवश्यक असते. त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबिरे महाविद्यालयाकडून आयोजित केले जातात. या शिबिरामधून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेतली पाहिजे. उत्कृष्ट अभ्यास आणि सुदृढ शरीरयष्टी संपादन केली पाहिजे. असे मत वडवणी पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्रीमती वर्षा ताई शिंदे व्हगाडे यांनी व्यक्त केले. पिंपरखेड

येथे लोकमान्य टिळक महाविद्यालय वडवणी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर आणि समस्त गावकरी मंडळी मौजे पिंपरखेड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १६ जानेवारी ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमात श्रीमती शिंदे बोलत होत्या. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, मी सुद्धा अशा शिबिरामध्ये उपस्थिती लावली आहे. त्यात पूर्णपणे सहभागी झाले आहे. या शिबिरामधून श्रमदान, व्याख्याने, रॅली आणि जनजागृतीची

अनेक प्रकारचे उपक्रम आयोजित केले जातात. यातून विद्यार्थ्यांनी चांगली प्रेरणा घेतली पाहिजे. आज मोबाईलचा वापर आवश्यक जरी असला तरी त्यावर काही बंधने विद्यार्थ्यांनी स्वतःच्या मनाने घातली पाहिजेत. आपल्या पालकांच्या श्रमाचे चीज करण्यासाठी आपण परिश्रम घेतले पाहिजेत. अशा प्रकारचा संदेश त्यांनी यावेळी दिला. मंचावर यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री पंजाबराव मस्के पाटील उपस्थित होते. प्रमुख पाहुणे आणि व्यासपीठाचा परिचय डॉ. अशोक खेत्री यांनी करून दिला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भालचंद्र कुलकर्णी वडवणी पोलीस स्टेशनचे श्री ढोबळे साहेब, गावचे सरपंच प्रतिनिधी श्री भगवानराव शिंदे, उपसरपंच आणि पत्रकार श्री अशोकराव निपटे, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन श्री श्रीनिवास निपटे, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री विनोद लांबुड सर यावेळी मंचावर उपस्थित होते.

अशोक डक यांची पत्रकारासोबत हुरडा पार्टीने रंगतोया मैत्रीचा रंग

माजलगाव (प्रतिनिधी):- मित्रासोबत हुरडा पार्टी म्हणजे थंडीच्या दिवसात शेतात जाऊन कवळी ज्वारी (हुरड) शेकोटीत भाजून ती चोळून गरमागरम खाण्याचा आणि एकत्र जेवणाचा आनंद लुटण्याचा एक पारंपारिक महाराष्ट्रीयन सोहळा आहे. जो शेती निसर्ग आणि मित्र सोबत गप्पा मारत साजरा केला जातो. नातेसंबंध आणि मैत्री बळकट करण्याच्या उद्देशाने मा.सभापती अशोक आबा डक यांच्या पत्रकारासोबत स्नेह मिलन हुरडा पार्टी चे आयोजन अशोक डक यांनी त्यांच्या मनुरवाडी येथील शेतामध्ये प्रतिवर्षेप्रमाणे याही वर्षी केल्याने त्यांच्यासोबत एक अविस्मरणीय अनुभव लाभल्याने पत्रकारांसोबत त्यांचा हुरडा पार्टीने अधिक मैत्रिणीचा रंग रंगत आहे.

अलीकडच्या काळात हुरडा पार्टीला तर दुर्मिळ झाल्या आहेतच. मकर संक्रातीच्या वाणासाठी लागणारी ज्वारीची कणसे पण वेळप्रसंगी भेटत नाहीत. मात्र ३० वर्षापासून डक परिवाराने चालू केली परंपरा ही आज मी कायम ठेवत. हुरडा पार्टीच्या निमित्ताने पत्रकार मित्र एकत्र जमून गरमागरम हुरडाचा आस्वाद घेत गप्पा छान मैफिल सभापती अशोक डक यांच्या शेतात रंगत आहे. पत्रकार सोबत एक जिव्हाळ्याचे आणि मैत्रीचे नाते जोपसणारे म्हणून अशोक डक यांची ओळख आहे. पत्रकारांच्या प्रत्येक सुखदुःखात कार्यक्रमात त्यांचा सहभाग असतो. गुरुवार रोजी दि.१५ रोजी मनुरवाडी येथील शेतामध्ये हुरडा पार्टीचे आयोजन केले होते. यावेळी पत्रकारांसोबत हुरडा पार्टी एवढी रंगली की त्यामध्ये मैत्रिणीचा रंग आणि वाढत गेला यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष संभाजी शेजूळ, एन. टी. सोळके. मा.सरपंच हरिभाऊ चंदनशिव सह पत्रकारांसोबत राजकीय सामाजिक हास्यविनोद गप्पा चर्चा रंगत यावेळी रानमेवा बोरे, हरभरा, गाजर, यानंतर नवऱ्याने भाजलेल्या शेकोटीत हिरवा गार लखलखीत हुरडा सोबत शेंगदाण्याची चटणी, दही, गुळ , ज्यामुळे जिभेला चटकदार चव घेण्याचा मनसोक्त आनंद लुटला. त्यानंतर जेवणावर बेत मारताना झणझणीत पाट्यावरील वाटणातील चटणीची वांग्याची भाजी कडक बाजरीची भाकर पापड कांदा गाजर इंद्रायणी तांदळाचा सुगंधी भात अशा साध्या भोजनाचा मनसूक्त आनंद घेतला. यावेळी पत्रकार तुकाराम येवले,पांडुरंग उगले, कमलेश जाब्रस , पुरुषोत्तम करवा, सुभाष नाकलगावकर , वैजनाथ घायतिडक, रत्नाकर कुलथे, नागापुरे,परमेश्वर सोळंके, बाळासाहेब आडागळे, हरीश यादव, दिलीप झगडे, दिनकर शिंदे, विष्णू उगले, धनंजय माने, सय्यद अलीम, यांच्या सह आदी पत्रकारांचा या हुरडा पार्टीत सहभागी होते.

अलीकडच्या काळात हुरडा पार्टया तर दुर्मिळ झाल्या आहेतच, पण संक्रातिच्या वाणासाठी लागणारी ज्वारीची कणसे पण वेळ प्रसंगी भेटत नाहीत. हुरडा पार्टीच्या निमित्ताने एकत्र जमुन गरमागरम हुर्ड्याचा आस्वाद घेत गप्पानच्या छान मैफिली पूर्वी रंगायच्या. अलीकडे असे प्रसंग दुर्मिळ झाले आहेत. आपली ग्रामीण संस्कृती जोपासन्याच्या दृष्टीने हुरडा पार्टयांसाठी खास प्रयत्न झाले पाहिजेत. डक परिवार गेल्या ३० वर्षापासून ही परंपरा कायम ठेवत पत्रकार मित्रासोबत हुरडा पार्टीचे मी आयोजन करतो. तसेच या पार्टीच्या निमित्ताने एकमेकाचे मैत्री संबंध वाढतात व सुखदुःखाविषयी गप्पा मारायचा एक योग येतो त्यामुळे मी सातत्याने या हुरडा पार्टीचे आयोजन करतो. मा.सभापती अशोक डक

चारीचे पाणी शेती पासून वडाकडे काडा यासाठी शेतकरी बाधवाचे तहसीलदारना निवेदन-शैलेंद्र पोटभरे

सिरसाळा (प्रतिनिधी):- धारूर शिवारामध्ये तांबवा येथील दिव्यांग बांधव सुदाम भालेकर व त्याच्या बंधू ची शेती आहे, त्या शेतीच्या कडेला रोडच्या साईटला पाण्याची चारी काढली असून त्या चारीचे पाणी वडचाकडे रोड लगत काढण्याकरता धारूर तहसीलदार यांना निवेदन दिले त्या निवेदनाची दखल घेऊन संबंधित मंडळ अधिकारी व त्या ठिकाणी तलाठी गेले परंतु शेजाऱ्याने त्यांच्यासमोर त्या दिव्यांग बांधवास तू थापड करून त्याला दम देऊन मारहाण केली. व या ठिकाणाहून मी पाणी काढू देणार नाही असे म्हणून शिवीगाळ करून दम दिला. या प्रकरणाची दखल घेत तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी पोलीस स्टेशन धारूर येथे गुन्हा दाखल केला . परंतु चारीचा प्रश्न काय मिटला नाही ते दिव्यांगत शेतकरी तहसीलदार यांच्याकडे चकरा मारून परेशान झाले होते. परंतु त्यांची दखल कोणी घेत नव्हते आज आम्ही धारूर तहसील ला जाऊन संबंधित तहसीलदार यांना तात्काळ पोलीस संरक्षण देण्याचे मागणी केली व त्यांना तात्काळ या प्रकरणाची दखल घेत पोलीस स्टेशनला पत्र देऊन संरक्षण देण्यात यावे अशी कळवले आज दिवसभर धारूर तहसील समोर ठिय्या मांडून हे काम करण्यास प्रशासनाला भाग पाडले.. व दिव्यांगण बांधवाला आधार देण्याचे काम केले.. यामध्ये मोलाचं काम रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी चे केज ता अध्यक्ष आनंद ओव्हाळ यांनी केले.. जोपर्यंत पर्यंत यांचा प्रश्न मार्गी लागणार नाही तोपर्यंत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी दिव्यांग बांधवांच्या सोबत आहे

रस्ते सुरक्षा ही सामूहिक जबाबदारी ठीक आहे पण ? :- शेख युनूस

बीड (प्रतिनिधी) बीड येथे सुरक्षा अभियान २०२६ चे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. त्या जिल्हाधिकारी साहेबांनी हेल्मेट त्याचबरोबर सीट बेल्टचा वापर करणे मद्यपान करून वाहन न चालवणे आणि वाहतूक नियमाचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले पण साहेब... त्यासाठी आपण सर्वात प्रथम बीड शहरातील रस्ते बनवण्यासाठी प्रयत्न करा. ज्या रस्त्यांची कामे बोगस झाली ते बिल पास करू नका.त्याचबरोबर बीडला सिग्नल बसण्याचे आदेश द्या. तसेच विकास योजना ची अंमलबजावणी करण्यासाठी नगरपालिका व अन्य संस्था यांच्याशी समन्वय साधून त्या त्या विभागाला सूचना द्या. आणि शहराच्या विकासाला गती द्या.त्याच बरोबर शहरात प्रत्येक कामामागे ची टक्केवारी आहे. ती कशी थांबता त्यासाठी कडक कायदेशीर नियम बनवा. चांगल्या प्रकारे शहराच्या विकास करा हीच,आपल्याकडून बीड शहरातील नागरिकाची अपेक्षा आहे.

२४ तासात अल्पवयीन पीडितेचा शोध व आरोपीला घेतले ताब्यात

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची बुलढाणा येथे कार्यवाही

बीड (प्रतिनिधी):- पोस्टे बीड ग्रामीण गुन्हा रजिस्टर नंबर २०७/२०२५ कलम १३७(२) भान्यास हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे दिनांक १५/०१/२०२६ रोजी दुपारी वर्ग झाला होता. पोउपनि पल्लवी जाधव यांनी मूळ फाइल चे अवलोकन केले. त्यानंतर फिर्यादी व साक्षीदार यांची भेट घेऊन गुन्ह्या संदर्भाने चौकशी केली. मिळालेल्या तांत्रीक माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी रोशन गवई रा. सोनाळा ता. संग्रामपुर जि. बॅलडाणा यांचे वास्तव्य बुलढाणा जिल्ह्यात असल्याचे समजले. त्यावरून रात्री ०९:०० वाजता -कढण ची टीम ही मा. एसपी सर यांच्या आदेशाने बुलढाणा जिल्ह्याकडे रवाना झाली. दिनांक १६/०१/२०२६ रोजी सकाळी ०३:०० वाजता, मिळालेल्या माहितीनुसार टीम सोनाळा तालुका संग्रामपुर जि. बुलढाणा येथे पीडित व आरोपीचा शोध घेत त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी पोहचली व त्यांना ताब्यात घेतले. पोस्टे सोनाळा येथे त्यांची नोंद करून, टीम त्यांना घेवून बीड कडे रवाना झाली. -कढण टीम सकाळी ०९:०० वाजता बीड ला आली. पीडित मुलीला विश्वासात घेवून तिचे समुपदेशन केले तसेच तिच्या आईवडिलांसोबत तिची भेट करून दिली. त्यानंतर पोस्टे बीड ग्रामीण येथे सदर पीडीत मुलगी व आरोपीला पुढील तपासकामी हजर केले.

सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा पवार मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली, झडख पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, हेमा वाघमारे, पोशी योगेश निर्धार , गजानन चौधरी, सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

गरिबांचे अतिक्रमण असते तर लगेचच जेसीबी ने काढले असते पाकिटात कायदा गुंडाळला का ?

बेकायदेशीर अतिक्रमण वाल्यांना वारंवार नोटीस बजावली असता प्रशासक चोपडे, ग्रामविकास अधिकारी मुसळे कारवाई का करत नाहीत

२६ जानेवारी रोजी शेतकरी संघटनेचे जिल्हा उप अध्यक्ष खिजर शेख, जयदेव शिगणे गावातलावात जल समाधी घेणार

तलवाडा (प्रतिनिधी):- गेवराई तालुक्यातील मौजे तलवाडा येथील जमिनीमध्ये असलेल्या पाझर तलावाच्या संरक्षण भिंती लगटच्या बेकायदेशीरपणे असलेले अतिक्रमण प्रशासकीय अधिकारी व ग्रामसेवक वेळो वेळी निवेदन व आंदोलनाचा इशारा देऊन देखील हटवत नसल्याकारणाने आम्ही दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी तलवाडा येथील पाझर तलावात जलसमाधी आंदोलन करणार असल्याचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी प्रशासनास दिनांक १५/१/२०२६ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की वरिल संदर्भात आम्ही दिनांक १०/६/२०२५ रोजी, १५/७/२०२५ रोजी, ६/८/२०२५ रोजी मा जिल्हाधिकारी कार्यालय बीड, मा मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जिल्हा परिषद बीड, आणि पंचायत समिती गेवराई याना सरकारी गायरान जमिनीमधील असलेल्या

पाझर तलावाच्या भिंती लगट असणारे बेकायदेशीर रित्या केलेले अतिक्रमण काढणे बाबत वारंवार निवेदने दिली होती. त्या त्या निवेदनाला आणुसरुन आम्हाला आतिक्रमण काढण्यात येईल आसे लेखी आश्वासन देऊन आमचे जलसमाधी आंदोलन स्थगित करण्यास आम्हाला भाग पाढल्या गेले. पण आज पर्यंत कोणतीही कारवाई न केल्यामुळे आम्ही परत दिनांक २६/१/२०२६ रोजी जलसमाधी घेणार याची शासन व प्रशासनाने नोंद घ्यावी. अनाधिकृत बांधकाम स्वत काढून घेणे बाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती गेवराई यांचे पत्र क्रमांक जा.क. २६२८ दिनांक १८/०७/२०२५ नुसार आले असता गाव तलाव संरक्षण भिंतीलगतच्या सर्व अतिक्रमणधारकास पहिली नोटीस दिनांक ११/०८/२०२५ रोजी तलवाडा ग्रामपंचायतचे प्रशासक चोपडे साहेब व ग्रामसेवक मुसळे साहेब यांनी काढली होती व नंतर १५/९/२०२५ रोजी दुसरी नोटीस काढली पण तिसरी व अंतिम सात दिवसांची नोटीस देण्यास टाळाटाळ पान २ वर...

पिठासीन अधिकारी म्हणून पहिलीच सर्वसाधारण सभा: नगराध्यक्षांच्या प्रशासकीय कामकाजाची दिसली प्रभावी चुणूक !

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- परळी वैजनाथ नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा आज गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी नगरपरिषद सभागृहात नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या पिठासीनतेखाली शांततापूर्ण अगदीच खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सभागृहाचे कामकाज अगदी कायदेशीर व काटेकोरपणे, नियमावलीला धरून आणि सभागृहाचे सर्व संकेत पाळत यशस्वी केले. पीठासीन अधिकारी म्हणून ही पहिलीच सर्वसाधारण सभा होती यामध्ये नगराध्यक्षांच्या प्रशासकीय

कामकाजाची प्रभावी चुणूक दिसून आली.

नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकीनंतर आज दि. १५ रोजी परळी नगर परिषदेच्या सभागृहात पहिली सर्वसाधारण सभा पार पडली.नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पिठासीन अधिकारी म्हणून नगर परिषदेची ही सभा अतिशय खेळीमेळीच्या व शांततापूर्ण वातावरणात पार पडली. या सभेत महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या तरतुदीनुसार नगरपरिषदेच्या उपाध्यक्षपदाची निवड प्रक्रिया राबविण्यात आली. निर्धारित वेळेत एकमेव नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाल्याने पठाण खैसर राजाखान यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याची अधिकृत घोषणा पिठाशीन अधिकारी म्हणून नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केली.सभेतील दुसऱ्या विषयानुसार महाराष्ट्र नगरपरिषद व नगरपंचायत (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्ती) सुधारणा नियम २०१० अन्वये नगरपरिषदेवर चार नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये देवीप्रसाद चुन्नीलाल पांडे, बाजीराव प्रकाशराव धर्माधिकारी, प्रणव प्रकाश मराठे व अजीज अब्दुल हबीब कच्छी यांचा समावेश असून, यांची अधिकृत घोषणा पिठाची अधिकारी म्हणून नगराध्यक्षा पान २ वर...

बीड ; मातंग समाजाची ज्येष्ठ नेते आमचे मार्गदर्शक भीमराव नाना वाकचौरे यांची नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करून शुभेच्छा दिल्या यावेळी नगरसेवक शेख मुस्तफा युवा नेते विठ्ठल आबा गुजर राजू लोखंडे बंटी भैया भिसे मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते

अंबाजोगाई पाणीपुरवठा नवीन पाइपलाइनच्या ७ किमी ची चाचणी यशस्वी-नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा

अंबाजोगाई (आरंभ वृत्तसेवा):- बीड शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी प्रयत्न सुरू केले असून, आज शनिवारी (दि.१७) नवीन पाइपलाइन ची ७ किमी ची चाचणी घेतली असून ती यशस्वी झाली माहिती नंदकिशोर दिली आहे. असल्याची मुंदडा यांनी अंबाजोगाई पाहता शहराला शहराचा

वाढता विस्तार पाणीपुरवठा योजनेचा सामना करावा लागत होता. ही शहरवासियांची अडचण ओळखून आ. नमिता मुंदडा यांनी प्रयत्न करुन शहरासाठी धनेगाव प्रकल्पावरुन नवीन पाइपलाइन साठी कोट्यावधींचा निधी मंजूर करुन घेतला ही पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू झाले आहे. तसेच नंदकिशोर मुंदडा यांनी पान २ वर...

धनगर समाजाच्या आरक्षणासाठी दिपकभाऊ बो-हाडे यांना पाठिंबा देण्यासाठी

लिंबागणेश पंचक्रोशीतील धनगर बांधव मुंबईकडे रवाना होणार-डॉ.ढवळे

लिंबागणेश (प्रतिनिधी):- धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, या प्रमुख मागणीसाठी धनगर समाजाचे नेते दिपकभाऊ बो-हाडे हे दि. २१ जानेवारीपासून मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसणार आहेत. त्यांच्या या न्याय्य मागणीला पाठिंबा देण्यासाठी मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज दि. १७ रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील मुख्य प्रवेशद्वारावर धनगर समाजासह अठरापगड जातीतील समाजबांधव मुंबईकडे रवाना होणार असल्याची घोषणा करण्यात आली. यावेळी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. येळकोट येळकोट जय मल्हार, जय मल्हार बोलो, मुंबई चलो, दिपकभाऊ आगे बढो, हम तुम्हारे साथ है, आरक्षण आमच्या हक्काचं आहे, नाही कोणाच्या बापाचं अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडण्यात आला. दिपकभाऊ बो-हाडे यांच्या नेतृत्वाखाली पान २ वर...

परळी-मुंबई वंदे भारत एक्सप्रेस रेल्वे सह ईतरत्र रेल्वे सेवा सुरू करावी-चेतन सौंदळे

मराठवाडा जनता विकास परिषद,परळी यांची सिनीअर डीसीएम यांच्याकडे मागणी

परळी (प्रतिनिधी):- जिल्ह्यातील सर्वाधिक व्यस्त असणारे रेल्वे स्टेशन म्हणून परळीची ख्याती आहे परळी -मुंबई वंदे भारत एक्सप्रेस रेल्वे सुरू करण्यासह नांदेड -पनवेल एक्सप्रेस रेल्वे गाडीच्या प्रवाशी,स्लीपर तसेच ए.सी.बोगींची संख्या तात्काळ वाढवावी तसेच परळी मार्गे पुणे,मुंबई,नागपुर, तिरूपती,अयोध्या,वाराणसी,गोवा व ईतर प्रमुख ठिकाणासाठी त्वरीत रेल्वे सुरू करण्याच्या मागणीचे निवेदन सिकंद्राबाद रेल्वे विभागाचे सिनिअर डीसीएम शिफाली कुमार यांना दि.१६ जानेवारी रोजी रेल्वे स्थानकाच्या तपासणीनिमित्त आले असताना परळी

रेल्वे स्थानकात देण्यात आले.

नांदेडहुन मुंबईला जाणा-या वंदे भारत एक्सप्रेस रेल्वेचे कनेक्शन मिळावे म्हणून परळी येथून पहाटे निघणा-या परळी- आदिलाबाद या पॅसेंजर रेल्वेची वेळ बदलावी तसेच प्रवासी जनतेच्या व्यापक हिताच्या दृष्टीने पुढील महत्वपूर्ण मागण्या देखील निवेदनात करण्यात आल्या आहेत.

मछलीपट्टणम -बीदर, सिकंद्राबाद-बीदर इंटरसिटी एक्सप्रेस,पाटणा-पूर्णा,रायचूर-परभणी ईत्यादी रेल्वे सेवा परळी-वैजनाथ पर्यंत त्वरीत विस्तारीत करावी. 'पूर्णा-परळी' रेल्वे परत जाताना बहुअंशी रिकामीच असते त्या ऐवजी ती लातूर- कुर्डवाडी किंवा उदगीर-बीदर पर्यंत विस्तारित करावी. अमरावती -पुणे व कोल्हापुर-नागपुर रेल्वे नियमित कराव्यात क्रॉसिंगच्या निमित्ताने घाटनांदूर,वडगाव (निळा) इत्यादी स्टेशन वर विविध गाड्या विनाकारण अधिक वेळ खोळंबून ठेवू नयेत,परळी पान २ वर...

बीड ते नाळवंडी रस्त्याच्या निकृष्ट कामावरून भाजप युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर आक्रमक

काम दर्जेदार होणार नसेल तर बंद पाडण्याचा इशारा

बीड (आरंभ वृत्तसेवा):- शहराजवळील नाळवंडी नाका ते नाळवंडी रस्त्याचा प्रश्न गेल्या २० वर्षांपासून प्रलंबित आहे. या रस्त्यासाठी ग्रामस्थांनी अनेक आंदोलने केली. त्यानंतर आता जिल्हा नियोजन समितीतून - निधी मंजूर झाला. मात्र सुरू असलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या तक्रारी होत्या. या परिसरात मोठ्या प्रमाणावर खडी क्रेशरची जड वाहतूक सुरू असल्यामुळे सध्या होत असलेले काम फार काळ टिकणार नाही,

अशी तक्रार ग्रामस्थांनी भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांच्याकडे केली. त्यानंतर त्यांनी शुक्रवारी (दि. १६) रस्त्याची पाहणी केली. काम दर्जेदार होणार नसेल तर बंद पाडण्याचा इशारा संबंधित अधिकाऱ्यांना दिला आहे. यावेळी डॉ. योगेश क्षीरसागर यांनी इंजि. चोपडे व पोकळे यांना कामाच्या दर्जाबाबत सूचना केल्या. शासनाच्या निकषांनुसार व गुणवत्तापूर्ण पद्धतीने काम न झाल्यास सदर काम तात्काळ बंद पाडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. यावेळी उध्दवराव मेहेत्रे, भाऊसाहेब सुरवसे, लक्ष्मीआई तांडाचे सरपंच स्वरूप राठोड (नाळवंडी), गणेश राऊत, जुजगव्हानचे पान २ वर...

माजी आ.भीमराव धोंडे यांनी रामकथेचे केले श्रवण; कथा निरूपणकार ह.भ.प.मंदार महाराजांच्या कौशल्याचे कौतुक!

आष्टी (प्रतिनिधी):- अध्यात्म हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मनुष्याच्या अंतिम समाधानासाठी धार्मिक कार्यक्रमात सहभाग आवश्यक असून त्यातून मिळणारे समाधान हे अंतिम असते असे उद्गार आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी काढले. दरम्यान,धार्मिक कार्यात निसंकोचपणे सर्वांनी उपस्थित राहून धर्म वाढवण्यासाठी सर्वोतोपरी सहभागी व्हावे असे आवाहनही माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले.

आष्टी येथे आ.सुरेश धस आणि संयोजन समितीच्या वतीने संगीत रामकथा निरूपणकार मंदार महाराज रामदासी यांच्या कथेच्या आयोजन करण्यात आले आहे. माजी आ.भीमराव धोंडे यांनी आष्टी शहरात श्रीराम कथेच्या मंडपामध्ये आज आवर्जून उपस्थिती लावली.रामकथेत पाचव्या दिवशी माजी

आ. भीमराव धोंडे यांनी भेट देऊन संगीत रामकथा निरूपणकार मंदार महाराज रामदासी यांच्या कथा निरुपणाच्या कौशल्याचे मन भरून कौतुक केले आणि या कथा आयोजकांचेही अभिनंदन केले.धार्मिक कार्यात्मिक संकोचपणे धर्म वाढवण्यासाठी आवर्जून उपस्थित असतो.सर्व नागरिकांनी आणि भाविक भक्तांनीही पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT